# मा. मंत्री (वित्त, नियोजन आणि वने) श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवार, दिनांक १८ जून २०१९ रोजी केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये

## भाग–दोन

(अ) **वस्तू व सेवा कर—**"ईज ऑफ डुईंग बिझनेस" साठी आवश्यक असलेली व्यापारसुलभता जीएसटी प्रणालीत अंतर्भूत करण्याकरिता निरंतर प्रयत्न.

(ब) **महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड अध्यादेश, २०१९.**

१. तडजोड योजनेच्या प्रथम टप्प्यास ३१ जुलै २०१९ तर द्वितीय टप्प्यास ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंत मुदतवाढ.

२. करापोटीचे समायोजन हे अविवादित करासाठी असेल की, विवादित करासाठी असेल याबाबत स्पष्टता.

३. अभय योजनेअंतर्गत लाभ एकूण थकित करास अविवादित कर व विवादित कर यांच्या गुणोत्तराच्या प्रमाणात परिगणित करण्याबाबत तरतूद.

४. प्रवेशकर अधिनियमाखालील भरणा केलेला कर, मूल्यवर्धित कर नियमाखालील वजावट मिळण्याबाबतची संदिग्धता दूर.

५. कर, व्याज, विलंब शुल्क किंवा संबंधित कायद्यान्वये लादण्यात येणाऱ्या शास्तीच्या रकमेबाबत स्वयंनिर्धारणा करता येईल.

६. नमुना-७०४ मध्ये लेखापरीक्षकाने शिफारस केलेला व व्यापाऱ्याने मान्य केलेला फक्त कर अविवादित असेल, यामुळे व्यापाऱ्यांना व्याज व विलंब शुल्कामध्ये दिलासा मिळू शकेल.

७. सदर सुधारणा १ एप्रिल २०१९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू होतील.

(क) **व्यवसायकर अधिनियम, १९७५.**

१. "ईज ऑफ डुईंग बिझनेस" या धोरणाच्या अनुषंगाने, सर्व नाव-नोंदणीधारक व्यावसायिकांना वर्षअखेर पर्यंत व्यवसायकर भरण्याची मुभा असेल.

२. नाव-नोंदणी प्राप्त करण्यास कसूर झाल्यास लागणारी शास्ती रद्द करून त्याऐवजी १.२५ टक्के या निश्चित दराने व्याजाची आकारणी केली जाईल.

(ड) **मूल्यवर्धित कर अधिनियम**

१. व्यापाऱ्याने विवरणामध्ये किंवा लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेला परतावा, मुद्देनिहाय निर्धारणा दरम्यान विचारात घेतला जाईल.

२. वार्षिक रुपये एक कोटीपेक्षा अधिक उलाढाल असणाऱ्या व रुपये पंचवीस हजाराइतके करदायित्व असणाऱ्या व्यापाऱ्यास नमुना-७०४ दाखल करण्यापासून सूट.

*****